आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२५ जून २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन जाणाऱ्या यानाची अंतराळात झेप

- पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- पुढच्या शैक्षणिक वर्षीपासून सीबीएसईच्या १० वीच्या परीक्षा वर्षातून दोन वेळा होणार

- संविधान हत्या दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत महाराष्ट्र अंतिम फेरीत

**<><><><><>**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना घेऊन फाल्कन नाईन हे रॉकेट आज अंतराळात झेपावलं. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या ॲक्सिऑम फोर या अवकाश मोहिमेला  आज फ्लोरिडा इथे केनेडी स्पेस सेंटरवरून आज दुपारी बारा वाजून १ मिनिटाने प्रारंभ झाला. या रॉकेटमध्ये असलेल्या स्पेसएक्स ड्रॅगन या अंतराळयानातून चार अंतराळवीरांचं पथक आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने प्रवास करत आहे. शुभांशु शुक्ला यांनी अंतराळातून संदेश पाठवला आहे.

**होल्ड - शुभांशु शुक्ला**

या मोहिमेचं नेतृत्व अमेरिकेचे कमांडर पेगी व्हिटसन करत आहेत. हंगेरीचे टिबोर कापू आणि पोलंडचे स्लावोस उझनान्स्की हे या मोहिमेतले तज्ञ आहेत. तर शुभांशू शुक्ला पायलट म्हणून काम पाहत आहेत. ते या मोहिमेदरम्यान सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाशी संबंधित सात प्रयोग करतील. यात किरणोत्सर्गाचा शैवालांवर

होणारा परिणाम, अवकाशात बियाणं पेरणं अशा विविध प्रकारच्या प्रयोगांचा समावेश आहे.

**<><><><><>**

ॲक्सिओम फोरच्या यशस्वी उड्डाणाबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल अभिनंदन केलं आहे. भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय बनणार आहेत. ते या प्रवासात एकटे नसून त्यांच्यासोबत १४० कोटी भारतीयांच्या इच्छा, आशा आणि आकांक्षा आहेत. शुक्ला आणि त्यांच्या सहकारी अंतराळवीरांना या मोहिमेच्या यशासाठी शुभेच्छा असं प्रधानमंत्री आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातल्या वनाझ ते रामवाडी या कॉरिडोरचा हा विस्तार आहे. यात वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली दरम्यान मेट्रो मार्ग उभारले जाणार आहेत. येत्या ४ वर्षात हे मार्ग पूर्ण होण्याची शक्यता आहे. केंद्र आणि राज्य सरकार या प्रकल्पाचा निम्मा-निम्मा खर्च करणार आहे. या प्रकल्पाविषयी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले....

**होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या निर्णयाबद्दल केंद्र सरकार आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. यामुळं पुण्याची वाहतूककोंडी सोडवायला मदत मिळेल तसंच शहराच्या विकासाला चालना मिळेल, असं अजित पवार म्हणाले.

आग्र्यात आंतरराष्ट्रीय बटाटा केंद्राचं दक्षिण आशियाई प्रादेशिक केंद्र उभारायलाही केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी मिळाली. तसंच झारखंडमधल्या झरिय़ा खाणीमुळं प्रभावित झालेल्या नागरिकांच्या पुनर्वसनासाठीचा आराखडाही या बैठकीत मंजूर झाला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या या बैठकीत ॲक्सिओम फोर या मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणाचं स्वागत करण्यात आलं तसंच, मंत्रिमंडळाने अंतराळवीरांना शुभेच्छाही दिल्या. आणीबाणीच्या घोषणेच्या ५० वर्षपूर्तीनिमित्त या घटनेचा निषेध करणारा ठराव या बैठकीत मंजूर करण्यात आला. आणीबाणीला विरोध करणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्तींच्या बलिदानाचं स्मरण म्हणून त्यांना दोन मिनिटं मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

पुढच्या शैक्षणिक वर्षीपासून सीबीएसईच्या १० वीच्या परीक्षा वर्षातून दोन वेळा होतील. पहिली परीक्षा फेब्रुवारीत होईल. ही परीक्षा देणं विद्यार्थ्यांना बंधनकारक असेल. या परीक्षेचा निकाल एप्रिलमध्ये जाहीर होईल. या निकालानंतर कुठल्याही ३ विषयातल्या गुणांमध्ये सुधारणा करायची असेल तर विद्यार्थ्यांना मे मध्ये होणारी परीक्षा द्यावी लागेल. तिचा निकाल जून महिन्यात जाहीर होईल. दोन्ही परीक्षांमधून या तिन्ही विषयांच्या गुणांपैकी ज्यावेळी सर्वाधिक गुण असतील, ते गृहीत धरले जातील असं सीबीएसईनं कळवलं आहे. बोर्डाची परीक्षा दोन वेळा होणार असली तरी अंतर्गत परीक्षा मात्र एकाचवेळी होईल.

**<><><><><>**

संविधान हत्या दिवस आज पाळण्यात येत आहे. २५ जून १९७५ या दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. १९७५ मध्ये या दिवशी तत्कालीन राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी अंतर्गत अशांततेच्या धोक्यांचा हवाला देत कलम ३५२ अंतर्गत आणीबाणीची घोषणा केली. या १८ महिन्यांच्या काळात मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या सर्वांना आजच्या संविधान हत्या दिनी आदरांजली वाहण्यात येत आहे. संविधान हत्या दिनानिमित्त मानवाधिकारांच्या मूल्यांचं संवर्धन करण्याच्या हेतूनं आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

आणीबाणीच्या काळात नवीन नेतृत्वाची बीजं रोवली गेली आणि त्यातून नरेंद्र मोदी नावाचा नेता घडला याची कथा सांगणाऱ्या पुस्तकाचं प्रकाशन आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते नवी दिल्ली इथे झालं. **The Emergency Diaries- Years that forged a leader** असं या पुस्तकाचं नाव आहे. आणीबाणीच्या काळातले आपले अनुभव या पुस्तकात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नमूद केले

आहेत. आणीबाणी ही भारतीय लोकशाहीतला सर्वात काळा अध्याय असून या काळात नागरिकांचे मूलभूत अधिकार पायदळी तुडवले गेल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमात म्हणाले. या कार्यक्रमात शहा यांनी लोकतंत्र जिंदाबाद यात्रेलाही हिरवा झेंडा दाखवला. देशभरात या यात्रेच्या माध्यमातून संवैधानिक मूल्यं, लोकशाही राज्यव्यवस्थेतले हक्क आणि आणीबाणीच्या काळातून मिळालेले धडे याविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.

<><><><><>

ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधून आतापर्यंत ३ हजार १५४ भारतीयांना मायदेशात आणण्यात आलंय. २९६ भारतीय आणि ४ नेपाळी नागरिकांना घेऊन येणारं विमान आज संध्याकाळी नवी दिल्लीत पोहोचलं.
या अंतर्गत इस्राइलमधून ८१८ भारतीय मायदेशी परत आले आहेत.

<><><><><>

IAEA, अर्थात आंतरराष्ट्रीय अणूउर्जा एजन्सीबरोबर सहकार्य थांबवण्याबाबतचं विधेयक इराणच्या संसदेत आज मंजूर झालं. यासाठीच्या योजनेच्या सर्वसाधारण आराखड्याबाबत संसदेच्या खुल्या अधिवेशनात सदस्यांनी सहमती व्यक्त केली. उपस्थित असलेल्या २२३ पैकी २२१ सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूनं, तर एका सदस्यानं विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. एक सदस्य तटस्थ राहिला. आपलं सार्वभौमत्व, हित, आणि जनतेचं रक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आपल्याला आहे. असं इराणनं म्हटलं आहे.

<><><><><>

दक्षिण गाझामधे शोधमोहिमेवर असलेलं, इस्रायलचं चिलखती वाहन स्फोटात उडाल्यानं सात सैनिक मारले गेल्याची पुष्टी आज इस्रायलनं केली. काल खान युनीस भागात हे वाहन जमिनीखाली लपवलेल्या बॉम्बच्या स्फोटामुळे उडालं. या वाहनाला लागलेली आग आटोक्यात आणता आली नाही. त्यामुळे त्यातली सर्व

सैनिक आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. त्याआधी कालच गाझा पट्टीत शोधमोहिमेवर असताना याच बटालियनचा दुसरा एक सैनिक गंभीररित्या जखमी झाला. इस्त्रायलच्या, मोसाद या गुप्तहेर संघटनेसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या तीनजणांना इराणनं आज फाशी दिली. हत्या करण्यासाठीची साधनं आयात करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. इस्त्रायल- इराण संघर्ष सुरु झाल्यापासून इराणनं हेरगिरीच्या आरोपावरुन किमान ७०० जणांना अटक केली आहे.

**<><><><><>**

मास्टर्स कप हॉकी स्पर्धेत पुरुष गटात महाराष्ट्रानं अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. आज झालेल्या  दुसऱ्या उपांत्य सामन्यात महाराष्ट्रानं ओदिशावर ४-१ अशा गोलफरकानं विजय मिळवला. त्या आधी झालेल्या उपांत्य सामन्यात तामीळनाडूनं चंदीगडवर विजय मिळवत अंतिम फेरी गाठली.

येत्या शुक्रवारी महाराष्ट्र आणि तामिळनाडू यांच्यात अंतिम सामना होईल. रौप्यपदकासाठी ओदिशा आणि चंदिगड यांच्यात सामना होईल.

**//<><><><><>//**